महाराष्ट्र शासन
**उच्च शिक्षण संचालनालय, मध्यवर्ती इमारत, महाराष्ट्र [illegible] ४११००१.**
www.dhepune.gov.in
फोन नं. ०२०/२६१२२११९, २६०५१५१२, २६१३०६२७, २६१२४६३९
Email: mavi.dhepune@gov.in

एनजीसी/२०२२/नॅक/अशा.अनु.म.वि./औवि/मवि-३/ 92208

दि. .०९.२०२२

**(ई-मेलद्वारे तात्काळ)**

03 OCT 2022

**प्रति,**

१. अध्यक्ष / सचिव, अशासकीय अनुदानित / विनाअनुदानित महाविद्यालयांच्या संस्था (सोबत यादी.)
२. प्राचार्य, अशासकीय अनुदानित / विनाअनुदानित महाविद्यालये (सोबत यादी.)

**विषय** - आपल्या महाविद्यालयांचे नॅक मूल्यांकन / पुनर्मुल्यांकन व मानांकन करुन घेणेबाबत...

**संदर्भ** - १. शासन निर्णय क्र. संकीर्ण २०१०/(२०/१०)/विशि-३, दि ०८आक्टों.,२०१०.
२. संचालनालयाचे पत्र क्र.एनजीसी/२०२२/नॅक/अशा.अनु.म.वि./औवि/मवि-३/१०१०० दि.२७.०७.२०२२.

प्रस्तुत विषयाच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, संदर्भिय क्र.१ येथील शासन निर्णय व संचालनालयाचे संदर्भिय पत्राचे अनुषंगाने उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, विद्यापीठ अनुदान आयोग नवी दिल्ली यांनी अकृषि विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालये यांना नॅक मूल्यांकन / पुनर्मुल्यांकन करुन घेण्याबाबत वेळोवेळी शासन निर्णय, शासन परिपत्रके, सुचनापत्रे निर्गमित करण्यात आली आहेत. त्यानुसार महाराष्ट्र राज्यात बहुसंख्य महाविद्यालयांनी नॅक मूल्यांकन / पुनर्मुल्यांकन प्रक्रीयेत सहभाग घेऊन नॅक कडून "नॅक मूल्यांकन दर्जा" प्राप्त करुन घेतला असून नॅकच्या विविध Cycles च्या (II, III,..... Cycle) कालावधीतही नॅक मूल्यांकन करुन घेतले आहे. NAAC मूल्यांकन हे महाविद्यालयाच्या गुणवत्तेचे मापदंड असून शैक्षणिक गुणवत्ता व दर्जा धारण करणेसाठी दर पाच वर्षात महाविद्यालयाचे मूल्यांकन व पुनर्मुल्यांकन करुन घेणे बंधनकारक आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या प्रभावी अंमलबजावणीच्या अनुषंगाने महाविद्यालये / विद्यापीठ स्तरावर अभ्यासक्रम, बहुविद्याशाखीय शिक्षण, कौशल्य आधारीत अभ्यासक्रम, परिक्षा मुल्यमापन, अध्ययन अध्यापन, स्वायत्तता इत्यादी बाबतीत अमूलाग्र बदल होऊ घातलेले आहेत. या दृष्टीकोनातून महाविद्यालयांनी नॅक मानांकन व मूल्यांकनाच्या प्रक्रियेतून आपली गुणवत्ता राखणे, गुणवत्ता वाढ करणे अपेक्षित आहे. विद्यापीठ अनुदान आयोग, नॅक बंगलोर, महाराष्ट्र शासन नॅक मानांकन व मूल्यांकनाबाबत आग्रही आहेत.

शासन निर्णय दि.०८.१०.२०१० नुसार "जी महाविद्यालये / संस्था नॅक मूल्यांकनाचा / पुनर्मुल्यांकनाचा प्रस्ताव सक्षम प्राधिकरणाकडे विहित मुदतीत पाठविणार नाहीत अशा महाविद्यालयाच्या विरुध्द संबंधित विद्यापीठाने असंलग्निकरण, इ.कारवाई करण्यासंदर्भात" संचालनालयामार्फत कळविण्यात आले आहे.

विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यानी नोटीस क्र.एफ-२०-४/२००९(आययुसी), दि.२९ जानेवारी, २०१५ मध्ये नॅक मूल्यांकन न करणाऱ्या महाविद्यालयांचे युजीसीचे अनुदान खंडीत करण्याची बाब नमूद केली आहे.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १०९ मधिल पोटकलम ०६(क) (ख) नुसार "विद्यापीठ, नवीन अभ्यास पाठयक्रम, विषय, विद्याशाखा किंवा अतिरिक्त तुकडी किंवा सॅटेलाईट केंद्र सुरु करण्यासाठीचे उच्च शिक्षणाच्या विद्यमान महाविद्यालयांचे किंवा परिसंस्थांचे अर्ज, जर, -

(क) ते, अधिस्वीकृती अभिकरणाच्या मानकांनुसार अधिस्वीकृती किंवा पुनर्रअधिस्वीकृती मिळण्यासाठी पात्र आणि अपेक्षित असले तरीसुध्दा, एकतर राष्ट्रीय मूल्यांकन व अधिस्वीकृती परिषदेकडून किंवा राष्ट्रीय अधिस्वीकृती मंडळाकडून अधिस्वीकृत किंवा पुनर्रअधिस्वीकृत करण्यात आले नसतील; आणि

(ख) राज्य शासनाने निर्धारित केलेल्या शर्तींचे ते अनुपालन करीत नसतील तर,

राज्य शासनाकडे पाठविणार नाही." अशाप्रकारे तरतूद करण्यात आलेली आहे.

तसेच महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम ११० मधिल पोटकलम (४) नुसार "महाविद्यालय किंवा परिसंस्था अधिस्वीकृती किंवा, यथास्थिति, पुनर्रअधिस्वीकृती मिळण्यासाठी पात्र आणि अपेक्षित असेल आणि असे महाविद्यालय किंवा परिसंस्था अधिस्वीकृतीच्या किंवा पुनर्रअधिस्वीकृतीच्या आवश्यकतांची पूर्तता करण्यात कसूर करील तेव्हा, अशा महाविद्यालयाला किंवा परिसंस्थेला विद्यापीठाकडून कोणतीही संलग्नता देण्यात येणार नाही." अशाप्रकारे तरतूद करण्यात आलेली आहे.

शासन निर्णय दि.२५.०९.२००९, दि.३०.१०.२०१०, दि.०२.०९.२०१३, दि.१३.०९.२०१७, आणि दि:१५.०९.२०१७ नुसार नवीन महाविद्यालयास अनुदान मंजुर करतांना / अस्तित्वात असलेल्या महाविद्यालयांना / विद्याशाखा / अभ्यासक्रम / विषय / वाढीव तुकडया इत्यादींना शासनाकडून मंजुरी घेण्यासाठी संबंधीत महाविद्यालयाचे नॅक मूल्यांकन व मानांकन (Accreditation) तसेच पुनर्मानांकन (Reaccreditation) करुन घेतले नसेल तर सदर महाविद्यालयाचे अर्ज विद्यापीठांनी शासनाकडे शिफारशी करु नयेत अशी तरतूद आहे.

याचिका क्र. ५२८०/२०१५ मध्ये मा.उच्च न्यायालय खंडपीठ नागपूर यांच्या दि.१६.११.२०१६ च्या निकालातही नॅक मूल्यांकन व मानांकनाचे महत्व अधोरेखित केले आहे. तसेच नॅक मूल्यांकन व मानांकन / पुनर्मानांकन प्रक्रीयेद्वारे नॅक चा अपेक्षित दर्जा प्राप्त करुन घेणे आवश्यक व बंधनकारक असल्याचे शासनाकडून वेळोवेळी कळविण्यात आलेले आहे.

आपल्या महाविद्यालयाचे NAAC च्या Cycles च्या (II, III, ....Cycle) नॅक मूल्यांकन / पुनर्मूल्यांकन करुन घेतलेले नॅक Accreditation ची वैधता संपुष्टात आली आहे. त्यापुढील Cycle अंतर्गत महाविद्यालयाचे पुनर्मूल्यांकन व मानांकन करुन नॅकचा दर्जा प्राप्त करुन घेणे बंधनकारक व अनिवार्य आहे.

विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली, नॅक बंगलोर व महाराष्ट्र शासन यांनी वेळोवेळी दिलेल्या निर्देशानुसार आपल्या महाविद्यालयाने एकदाही नॅक मूल्यांकन व मानांकन, पुनर्मूल्यांकन / पुनर्मानांकन प्रक्रियेत सहभाग घेतलेला नाही, असे निदर्शनास आले आहे. ही बाब प्रशासकीय व शैक्षणिकदृष्टया गंभीर स्वरुपाची आहे, तसेच आपण विहित तरतुदींचे उल्लंघन करीत असल्याचे ही निदर्शनास येत आहे.

सबब, आपण पुढील ६ महिन्यांत नॅक मानांकन व मूल्यांकन, पुनर्मूल्यांकन / पुनर्मानांकन प्रकिया पूर्ण करुन नॅकचा अपेक्षित दर्जा प्राप्त करुन घेणे बंधनकारक आहे. अन्यथा, शासन नियमानुसार व प्रचलित धोरणानुसार पुढील उचित कार्यवाही करण्यात येईल, याची नोंद घेण्यात यावी.

(डॉ.धनराज माने)
**शिक्षण संचालक, उच्च शिक्षण,**
**महाराष्ट्र राज्य, पुणे.**

**प्रत-** **माहितीस्तव सादर**

१. मा.प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मंत्रालय,मुंबई.
२. स्वीय सहाय्यक, मा.मंत्री उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मंत्रालय,मुंबई.

**प्रत-** **माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी**

१. कुलसचिव, संबंधित अकृषि विद्यापीठे.
२. विभागीय सहसंचालक, (उच्च शिक्षण) मुंबई, पुणे, पनवेल, औरंगाबाद, अमरावती, नांदेड, नागपूर.